दैनिक
# सह्याद्रीचा राखणदार
www. sahyandrinews.com
Scan QR code to visit... Epaper Portal
• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •
• (महाराष्ट्र) • वर्ष ०१ ले • अंक ११५ • Title - Code :- MAHMAR49513 • शनिवार दि.२० जानेवारी २०२४ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.
Scan QR code to visit... Epaper Portal

# महावितरणामध्ये ५ ३४७ कंत्राटी पदे भरणार

**जळगाव**–महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित (महावितरण) अंतर्गत विद्युतसहाय्यक पदांच्या एकूण ५३४७ रिक्तजागा भरण्यासाठी पदांनुसार पात्र असणाऱ्या उमेदवारांकडून जानेवारी महिन्यांपासून अर्ज मागवण्यात येणार आहेत.अर्ज ऑनलाइन पद्धतीने करायचा आहे. कंपनीच्या संकेतस्थळावर काही दिवसात याबाबत लिंक उपलब्ध होणार आहे. विद्युत सहाय्यकपदासाठी महाराष्ट्रराज्य माध्यमिक व उच्च माध्यमिकशिक्षण मंडाळाच्या माध्यमिक शालांतपरीक्षा व आयटीआय उत्तीर्ण असावे. यापदासाठी अर्ज केल्यानंतर फेब्रुवारी वमार्च महिन्यात ऑनलाईन पद्धतीने क्षमताचाचणी परीक्षा होणार आहे. तीन वर्षकालावधीसाठी कंत्राटी पद्धतीने ही भरती होणार आहे.तांत्रिक कर्मचारी हे निश्चित केलेल्यातासांपेक्षा अधिक तास काम करतात.त्यामुळे प्रचंड मानसिक व शारीरिक ताणत्यांच्यावर येतो. निश्चित केलेल्या कामाच्यातासाच्या व्यतिरिक्त जे काम तांत्रिककर्मचारी करणार त्यांना त्या कामाचामोबदला देण्याबाबतचे परिपत्रककाढण्याबाबत तत्त्वतः मान्य करण्यात आले,अशी माहिती महाराष्ट्र स्टेट इलेक्ट्रिसिटीवर्कर्स फेडरेशनने दिली.महाराष्ट्र स्टेट इलेक्ट्रीसिटी वर्कर्सफेडरेशनतर्फे महावितरण कंपनीतीलप्रलंबित प्रश्नावर महावितरण कंपनीच्याप्रशासनास क्रमबद्ध आंदोलनाची नोटीसदिली होती. प्रशासनासमवेत मागण्यांवरचर्चा होऊन काही मागण्या तत्वत: मान्यझाल्या. त्यानुसार कनिष्ठ–तंत्रज्ञ (विद्युतसहायक) पदांची जाहिरात काढणे, निम्नस्तरलिपिक (लेखा) या प्रवर्गातील रिक्तजागांपैकी ५० टक्के जागा भरणे, उर्वरितजागांवर अनुकंपातत्त्वावर मृतकर्मचाऱ्यांच्या वारसांना सामावून घेणेआदी मागण्यांचा समावेश होता.रित्या पूर्ण केल्यानंतर कंपनीच्यानियमानुसार तंत्रज्ञ या नियमीत पदावर,नियमानुसार सामावून घेण्याचा निर्णयहोऊ शकतो. सविस्तर निवेदन / सूचनाकंपनीच्या ु.ारहरवळीलो.ळप यासंकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.अधिक माहिती संकेतस्थळावर पीडीएफस्वरुपात उपलब्ध करुन दिली जाणारअसल्याचे सांगण्यात आले.विद्युत सहाय्यक पदसंख्या : ५३४७ जागा पात्रता : पदाच्याआवश्यकतेनुसार वयोमर्यादा : १८ ते २७ वर्षेपरीक्षा शुल्क : खुला वर्ग २५० रुपये, इतर १२५ रुपये अधिकृत संकेतस्थळ



# चक तिरवंजा(कवठी)येथील युवकांचा शिवसेना (उबाठा) गटात प्रवेश

## जिल्हाप्रमुख मुकेश जिवतोडे यांच्या नेतृत्वात बांधले शिवबंधन

**भद्रावती । प्रतिनिधी**

तालुक्यातील चक तिरवंजा ( कवठी) येथील असंख्य युवकांनी जिल्हाप्रमुख मुकेश जिवतोडे यांच्या नेतृत्वात व येथील सरपंच शंकर भोगेकर यांच्या सहकार्याने शिवबंधन बांधून दिनांक १८ जानेवारी रोजी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) गटात प्रवेश घेतला.शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाच्या वतीने पक्षाचे कार्य घरोघरी पोहोचविण्यासाठी पक्षप्रमुख उद्धव ठाकरे, पूर्व विदर्भ संपर्क प्रमुख आमदार भास्कर जाधव, जिल्हा संपर्क प्रमुख प्रशांत कदम व विधानसभा संपर्क प्रमुख रितेश रहाटे यांच्या मार्गदर्शनात व जिल्हाप्रमुख मुकेश जिवतोडे यांच्या नेतृत्वात जनसंपर्क अभियान राबविल्या जात आहे. या जनसंपर्क अभियानात शिवसेनेच्या वतीने करण्यात आलेल्या कामाचा लेखाजोखा सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहोचविण्यात येत आहे. या जनसंपर्क अभियानाला ग्रामीण भागात उत्फुर्त प्रतिसाद



मिळत आहे. जिल्हाप्रमुख मुकेश जिवतोडे यांच्या जनसंपर्क अभियानामुळे शिवसेनेत अनेकांची इन्कमिंग सुरू आली आहे. ग्रामीण भागातील असंख्य युवक शिवसेनेच्या कार्याला प्रेरित होऊन व जिल्हाप्रमुख जिवतोडे यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेऊन शिवसेनेत प्रवेश घेत आहे. भद्रावती तालुक्यातील चक तीरवंजा (कवठी ) येथील जनसंपर्क अभियानादरम्यान गावातील असंख्य युवक व पुरुषांनी जिल्हाप्रमुख मुकेश जीवतोडे यांच्या नेतृत्वात व सरपंच शंकर भोगेकर, विधानसभा संघटक सुधाकर मिलमिले, सचिन बोढाले, प्रकाश कुरेकार, व गोविंद बदकी यांच्या सहकार्याने शिवबंधन बांधून शिवसेनेत प्रवेश घेतला. यामध्ये सूरज बल्की, स्वरूप ताजने, दुष्यंत झाडे, धनराज ताजने , अक्षय बल्की, संजय विधाते, अभिषेख ताजने, स्वप्नील मालेकर यांचा समावेश आहे.यावेळी विधानसभा संघटक सुधाकर मिलीमिले, सरपंच शंकर भोगेकर सचिन बोढाले, प्रकाश कुरेकर, गोविंद बदकी व समस्त शिवसेना पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# ना.सुधीर मुनगंटीवार यांच्या पाठपुराव्यामुळे धान खरेदी नोंदणीची मुदत ३१ जानेवारीपर्यंत वाढविली

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

खरेदी केंद्रांची मोजकी संख्या आणि इंटरनेट नेटवर्कची समस्या यामुळे शेतकऱ्यांची धान खरेदी नोंदणी पुरेशी झालेली नसल्यामुळे नोंदणीची मुदत आता ३१ जानेवारी २०२४ पर्यंत वाढविण्यात आली आहे. आतापर्यंत तीनदा ही मुदत वाढविण्यात आली आहे. शेतकऱ्यांची होणारी गैरसोय लक्षात घेता राज्याचे वन, सांस्कृतिक कार्य व मत्स्य व्यवसाय मंत्री तथा चंद्रपूरचे पालकमंत्री ना. सुधीर मुनगंटीवार यांनी यासाठी पाठपुरावा केला होता, त्या पाठपुराव्याला यश आले आहे. शेतकरी बांधव आधारभूत किमंत योजनेअंतर्गत नेमण्यात आलेल्या खरेदी केंद्रावर नोंदणी करून धान व भरडधान्य विक्री करतात. जिल्ह्यात केंद्रांची संख्या फार मोजकी आहे. त्यामुळे ज्या जिल्ह्यात धान व भरडधान्य मोठ्या प्रमाणात उत्पन्न होते त्या जिल्ह्याला या खरेदी नोंदणीच्या मिळालेल्या मुदतवाढीमुळे लाभ होणार आहे. चंद्रपूर जिल्ह्यातील शेतकरी बांधवांनी याबाबत



मागणी केली होती. या मागणीचे गांभीर्य लक्ष्यात घेत वने व सांस्कृतिक कार्य मंत्री ना. सुधीर मुनगंटीवार यांनी धान नोंदणीची मुदत ताबडतोब वाढविण्यात यावी, असा आग्रह केला.ना. मुनगंटीवार यांनी राज्याचे अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांना पत्र लिहत मुदत वाढविण्याची आग्रही मागणी केली. ना. मुनगंटीवार यांच्या पत्राची दखल घेत ना.भुजबळ यांनी संबंधित विभागाला काही तासातच आदेश निर्गमित करण्याचे निर्देश दिले. त्यानुसार धान नोंदणीची मुदत आता ३१ जानेवारी २०२४ पर्यंत वाढविण्यात आली आहे. पुन्हा एकदा मुदत वाढवून मिळाल्याने शेतकऱ्यांनी ना.सुधीर मुनगंटीवार यांचे आभार व्यक्त केले आहे.

# लोकमान्य प्राथमिक विद्यालयात क्रीडा व सांस्कृतिक महोत्सव संपन्न



**वरोरा । प्रतिनिधी**

लोकमान्य प्राथमिक विद्यालय वरोरा येथे क्रीडा सत्र व सांस्कृतिक महोत्सवाचे आयोजन करण्यात आले . या सांस्कृतिक महोत्सवाचे अध्यक्ष श्रीकांत पाटील अध्यक्ष लोक शिक्षण संस्था वरोरा हे होते तर उद्घाटक अनिल डोंगरे , कार्यवाह विश्वनाथ जोशी प्रमुख पाहुणे , तसेच पांण्डेय, विकास घुडे ,मंगेश मल्हार ,गटशिक्षणाधिकारी ज्ञानेश्वर चाहारे, विस्तार अधिकारी नामदेव राऊत , सीमा राऊत, सेवानिवृत्त मुख्याध्यापक भोंबे,शाळा व्यवस्थापन समिती उपाध्यक्ष आशिष घुमे, पालक शिक्षक संघ उपाध्यक्ष त्रिशूल घाटे शाळेच्या मुख्याध्यापिका सुनिता उरकांदे हे उपस्थित होते. विद्यार्थ्यांमध्ये असलेल्या सुप्त कलागुणांना वाव मिळावा म्हणून क्रीडा व सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.लोक शिक्षण संस्थेचे अध्यक्ष श्रीकांत पाटील हे बालकलाकारांचे नृत्य पाहून भारावून गेले,बालकलाकारांना शुभेच्छा दिल्या. लोकमान्य प्राथमिक विद्यालयाला लाभलेला हा सांस्कृतिक वारसा अजूनही जोपासल्या जात आहे असे मत त्यांनी व्यक्त केले. गटशिक्षणाधिकारी ज्ञानेश्वर चहारे यांनी आपल्या मनोगतात सांगितले की सगळीकडे इंग्रजी शाळांचे प्रस्त असताना व शाळेत कमी शिक्षक असताना दर्जेदार कार्यक्रम सादर केल्याबद्दल शाळेचे व संस्थेचे कौतुक केले .मराठीचे प्राबल्य पहिलेही होते यापुढेही असेच राहील असे मत त्यांनी व्यक्त केले. शाळेच्या मुख्याध्यापिका सुनीता उरकांदे यांनी प्रास्ताविक केले संचालन रामभाऊ घोरुडे तर आभार रजनी गोंडे यांनी केले.कार्यक्रमाच्या यशस्वी ते करिता उमेश लाभे, सुरेश बरडे, अनंता आमटे, बोढे,लेडांगे, गुरनुले तसेच मुसळे, बोबडे, कांबळे अंबुलकर, गजानन कनोजवार या सर्वांनी सहकार्य केले.

# भाजपा ओबीसी मोर्चाचे मंदिर स्वच्छता अभियान



**पुलगाव । प्रतिनिधी**

भारतीय जनता पार्टी ओबीसी मोर्चा पुलगाव शहर तर्फे दिनांक १९ जानेवारीला सकाळी ९ वाजता वर्धा नदी पंचधारा येथील पुरातन शिव मंदिरामध्ये स्वच्छता अभियान राबविण्यात आले. शिव मंदिरासोबतच स्मशान घाट येथील हनुमान मंदिर व शंकराची मूर्ति सुद्धा पाण्याने धुवून स्वच्छ करण्यात आली.

या संपूर्ण परिसरातील लहान लहान झुडुप व वाढलेले गवत काढून टाकण्यात आले. परिसरामध्ये जमा झालेला सर्व कचरा एकत्रित करून नगर परिषदेच्या गाडीत टाकून परिसर झाडून स्वच्छ करण्यात आला.

या संपूर्ण कार्यात भाजपा ओबीसी मोर्चाचे प्रदेश अध्यक्ष संजय गाते, भाजपा ओबीसी मोर्चा जिल्हाध्यक्ष मंगेश झाडे, भाजपा शहर अध्यक्ष नितीन बडगे, भाजपा अल्पसंख्यांक मोर्चा प्रदेश सचिव शकील खान, ओबीसी मोर्चा शहर अध्यक्ष अनिल लेकुरवाळे,नाचणगाव मंडळ अध्यक्ष राहुल घाटे, देवळी ग्रामीण मंडळ अध्यक्ष रुपेश अडेकार, जिल्हा उपाध्यक्ष राजेश गुप्ता, संदीप बोरकुटे, चंद्रशेखर बेले, प्रशांत लोणकर, मानकर काका, सचिन चौधरी, श्रीकांत बिरे, विजय ढगे, चंद्रकांत शहाकार, निखिल आटे, संदीप अजमिरे, कुणाल गणवीर व मंदिराचे विश्वस्त देवीसिंग ठाकूर तसेच सर्व ओबीसी मोर्चाचे कार्यकर्ते उपस्थित होते.

# कर्नाटक एम्टा कोळसा खाणीत कामगाराची आत्महत्या


**भद्रावती । प्रतिनिधी**

शहरा लगतच्या बरांज येथील एम्टा कोळसाखान परिसरात एका कामगाराने सीट बेल्टच्या सहाय्याने एका ट्रकला गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना शुक्रवार १९ जानेवारी रोजी सकाळच्या सुमारास उघडकीस आली.संजय मोचीराम (२६)असे मृतकाचे नाव आहे. मृतक ओरिसा राज्यातील रहिवासी आहे. घटनेची माहिती प्राप्त झाल्यावर भद्रावती पोलिसांनी घटनास्थळी पोहोचून आवश्यक ती कारवाई केली व मृतदेह शवविच्छेदनासाठी भद्रावती ग्रामीण रुग्णालयात दाखल केला. सदर युवक हा एम्टा कोळसाखान कंपनीत कार्यरत असलेल्या एक्सप्रेस कंपनीत मेकॅनिकल म्हणून होता अशी माहिती कळते. त्याच्या आत्महत्येचे कारण मात्र कळू शकले नाही. पोलिसांनी मृतकाच्या ओरिसा येथील नातेवाईकांना याची माहिती दिली असून घटनेचा पुढील तपास करीत आहे.

# शिकारीच्या शोधात वाघाचा विहिरीत पडून मृत्यू

**भद्रावती । प्रतिनिधी**

तालुक्यातील चालबर्डी येथील पहीत शेतशिवारात शिकारीच्या शोधात असलेल्या वाघाचा कडघरे नसलेल्या विहिरीत पडून मृत्यू झाल्याची घटना उघडकीस आली. हा वाघ पाच वर्षे वयाचा आहे.चालबर्डी येथील शेत सर्व्हे क्रमांक ५४ मध्ये शिकारीच्या शोधात असताना विहिरीत पडून वाघाचा मृत्यू झाला.ही माहिती वनरक्षक जे.ई. देवगडे यांना माहिती झाली. त्यांनी या घटनेची माहिती भद्रावती वनपरिक्षेत्र अधिकारी एच.पी. शेंडे यांना दिली. घटनास्थळी सहाय्यक वनसंरक्षक जी.आर. नायगमकर यांनी



घटनास्थळाची पाहणी केली असता नर जातीचा वाघ हा कुजलेल्या अवस्थेत आढळला. त्याचे शव चंद्रपूर येथे नेण्यात आले. तिथे डॉ. कुंदन पोडचलवार, डॉ. आर.एस. रोडे या पशुवैद्यकीय अधिकारी यांनी शवविच्छेदन केले.घटनेचा पुढील तपास वन अधिकारी करीत आहेत.

# अखेर ’त्या’ नरभक्षक वाघाला जेरबंद करण्यात ’आरआरटी’ला यश

**गडचिरोली । प्रतिनिधी**

आलापल्ली वन विभागात दोन जणांचा बळी घेणारा नरभक्षक वाघाला जेरबंद करण्यात ’आरआरटी’ला अखेर यश आला आहे.मुलचेरा तालुक्यातील रेंगेवाही गावालगतच्या जंगलात गुरुवार (१८ जानेवारी) रोजी रात्रीच्या सुमारास त्या वाघाला जेरबंद करण्यात आले.

आलापल्ली वनविभागात वाघाच्या हल्ल्यात दोन महिलांचा बळी गेल्यानंतर वाघाला जेरबंद करण्याची मागणी होताच मुलचेरा तालुक्यात रॅपिड रिस्पॉन्स टीम दाखल झाली. नरभक्षक वाघाला जेरबंद करण्यासाठी १६ जानेवारी पासून मोहीम सुरू करण्यात आले.मात्र,रॅपिड रिस्पॉवन्स टीमला हुलकावणी देत १७ जानेवारी रोजी रेंगेवाहीच्या जंगलात त्या वाघाने गाईचा शिकार केला.त्यानंतर आरआरटी आणि वनविभागाचे अधिकारी, कर्मचारी यांनी रेंगेवाहीच्या जंगलात ट्रॅप कॅमेरे लावून त्या वाघाला पकडण्याची मोहीम सुरू केली.अखेर गुरुवार १८ जानेवारी रोजी रात्रीच्या सुमारास त्या



वाघाला जेरबंद करण्यात त्यांना यश आले.विशेष म्हणजे ती दोन ते अडीच वर्षाची वाघीण असल्याची माहिती समोर येत आहे. याबाबत आलापल्लीचे उपवनसंरक्षक राहुल सिंग तोलिया यांच्याशी भ्रमणध्वनी द्वारे संपर्क केले असता त्यांनी वाघाला जेरबंद केल्याच्या बातमीला दुजोरा दिला आहे.तर त्याला कुठे सोडायचा याबाबत वरिष्ठ पातळीवर चर्चा सुरू असल्याची माहिती आहे.मागील पाच महिन्यापासून या वाघिणीने अक्षरशः धुमाकूळ घातला होता. सुरुवातीला या वाघिणीने पाळीव प्राण्यांवर हल्ला करत ठार केले.त्यानंतर विश्वनाथनगर आणि कोठारी येथील दोन जणांवर हल्ला करून जखमी केले.तर ७ जानेवारी रोजी चिंतलपेठ येथील सुषमा देवदास मंडल आणि १५ जानेवारी रोजी कोडसापूर येथील रमाबाई मुंजमकर या दोन महिलांचा बळी घेतला. या घटनांमुळे परिसरात प्रचंड दहशत निर्माण झाली होती. आता या वाघिणीला जेरबंद केल्याने परिसरातील नागरिकांना मोकळा श्वास घेता येणार आहे.वाघिणीला जेरबंद करण्यासाठी डॉ.आर.एस.खोब्रागडे, पशुवैद्यकीय अधिकारी (वन्यजीव) ता.अं.व्या.प्र. चंद्रपूर तथा आर आर टी प्रमख ए.सी.मराठे, पोलीस नाईक,(शुटर)ता.अं.व्या.प्र.चंद्रपूर आणि आर.आर. टी.सदस्य दिपेश.डि.टेंभुर्णे, योगेश.डि.लाकडे, गुरुनानक .वि.ढोरे, श्री.वसीम.ऐन.शेख, विकाश.एस.ताजने, प्रफुल.एन.वाटगुरे, श्री. ए. डी. कोरपे आर.आर. टी. वाहनचालक,ए. एम. दांडेकर, आर.आर.टी.वाहनचालक तसेच वन विभागाचे कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतला.

## ’आरआरटी’ने पकडले तब्बल ६३ वाघ

**चंद्रपूर आणि गडचिरोली जिल्ह्यातील मानव आणि वाघ यांच्यातील वाढत्या संघर्षाच्या चिंतेच्या पार्श्वभूमीवर, वनविभागाच्या अधिकाऱ्यांनी गेल्या दशकभरात ६२ वाघांना पकडून जेरबंद केले.तर गडचिरोली जिल्ह्यातील मुलचेरा तालुक्यात अजून एक वाघिणीला जेरबंद करण्यात त्यांना यश आले असून आता ही संख्या ६३ वर पोहोचली आहे.आरआरटी प्रमुख तथा पशुवैद्यकीय अधिकारी डॉ रविकांत खोब्रागडे यांनी यात मोलाची भूमिका बजावली आहे.**

# कृषी क्षेत्रातील अवकळा

**भारत हा कृषिप्रधान देश आहे. वर्षानुवर्षे अनादी काळापासून आपल्याकडे शेती हाच मुख्य व्यवसाय राहिलेला आहे. उच्च शेती, मध्यम व्यापार आणि कनिष्ठ नोकरी ही म्हण त्यातूनच जन्माला आली असावी असे वाटते. अशी उच्च शेतीची परंपरा असलेल्या या शेती व्यवसायाला उतरती कळा का आली? याचे चिंतन करणे आवश्यक आहे. एकेकाळी या शेतीने समाजाला जगविले आहे. आजही जगवत आहे. पुढेही जगविणार आहे. शेतीला अजूनपर्यंत तरी अन्य पर्याय उपलब्ध नाही. उपाशी माणसाच्या पोटात दोन घास अन्न भरविण्याचे आणि त्यांच्या चेहऱ्यावर समाधान दाखविण्याचे सामर्थ्य केवळ शेतीतच आहे. या व्यवसायाने पोटात दोन घास भरविण्याचे कौशल्य दिले आहे. असे म्हणतात की, हा व्यवसाय प्रामाणिकपणे जर केला तर माणूस उपाशी मरणार नाही.**




आजही वडिलधाऱ्या मंडळीच शेतीवर फार प्रेम आहे. ते सांगतात नोकरी नाही लागली तर आपली शेती आहेच. घरी शेती कर, तिची मशागत कर, सेवा कर, तिच्यावर माया लाव. तुला कुठे कमी पडू देणार नाही. एका दाण्याचे चार दाणे करण्याची किमया फक्त शेती व्यवसायातच आहे. त्यामुळे या व्यवसायाची सर दसऱ्या कोणत्याही व्यवसायाला येत नाही. एका कुटुंबाला जगवून शेजाऱ्यांनाही जगण्याची ताकद फक्त आणि फक्त या शेती व्यवसायातच आहे. पण दुर्दैवाने याच शेतीकडे आज मोठ्या प्रमाणात दुर्लक्ष होत आहे. एक नुकसानीचा आणि त्रुटीचा व्यवसाय म्हणून आज शेती व्यवसायाकडे बघितले जाते. अलीकडे कुणीही खुशीने शेती करताना दिसत नाही. कारण शंभराचे सव्वाशे होण्याऐवजी साठच होत असल्याने अनेकांनी याकडे पाठ फिरविली आहे. फिरवली जाणारी पाठ ही दुर्दैवाने चिंतेची बाब आहे. वाढत्या महागाईतला झेपविण्याची क्षमता फक्त शेती व्यवसायातच आहे. तरीही आपण शेतीकडे का लक्ष देत नाही? ज्यांच्याकडे शेती आहे त्यांचा शेती मोडण्याकडे कल वाढला आहे. ग्रामीण भागात अनेक शेत्या बंजर पडलेल्या दिसतात. ज्या वापरात आहे त्यातही मन लावून तिथे मशागत केली जात नाही. याचे कारण हा व्यवसाय नफा देईल असे वातावरण राहिलेले नाही. शेतीमध्ये पूर्वी नैसर्गिक खतांचा वापर केला जायचा. घरीच तयार केलेली बी बियाणे वापरली जाऊन ती शेतात पेरली जायची. आणि कौटुंबिक समन्वयातून केल्या जाणाऱ्या मशागतीने शेतीतून निश्चितच फायदाच फायदा व्हायचा. परंतु अलीकडे शासन रासायनिक खताचा वापर करण्यास शेतकऱ्यांना प्रवृत्त करत आहे. अनेक सुप्रसिद्ध नट, नट्यांच्या माध्यमातून रासायनिक खतांची विक्री केली जाते. दूरदर्शन, वर्तमानपत्रे, फ्लेक्स यावर दिसणारी जाहिरात बघून शेतकरीही त्याकडे आकर्षित होतो. रासायनिक खते व कृषी केंद्रातून बी बियाणे आणून शेतात लागवड करतो. रासायनिक शेती कशी करावी, मशागत करताना त्याला तांत्रिक ज्ञान नसल्यामुळे पीक कमी कमी होते. राज्यात अनेक कृषी विभाग आहेत. राज्य शासनाचा कृषी विभाग, जिल्हा परिषदेचा कृषी विभाग, तालुकास्तरावर पंचायत समितीचा कृषी विभाग हे इतके सारे तज्ज्ञ अधिकारी व कर्मचारी यांनी तुडुंब भरलेली कार्यालये असतांनाही शेतकऱ्यांना पाहिजे तसे योग्य मार्गदर्शन दिले जात नाही. मदत केली जात नाही. परिणामतः शेतीची मशागत झाल्यानंतर पेरणी कशी करायची? त्या पिकाची काळजी कशी घ्यायची? फवारणी केव्हा करायची? कुठला आजार आल्यावर कुठलं औषध वापरायचं? याचं तांत्रिक ज्ञान नसल्याने शेतकरी आपल्या स्वतःच्या मर्जीने वा चार चौघांचा सल्ला ऐकून शेतीची मशागत करतो. पिकांची काळजी घेतो. परिणामतः त्यात चुकीचे झाले की मालाच्या उताऱ्यामध्ये फरक पडतो. शेती लाभार्थी कोलमडतो.या निमित्ताने एक प्रश्न पडतो की महाराष्ट्र शासनाची अशी विविध प्रकारची कृषी कार्यालये असताना या कृषी अधिकाऱ्यांना शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्याची गरज का भासत नाही. आजवर कृषी अधिकारी शेताच्या बांधावर जाऊन व गावात येऊन शेतकऱ्यांना मार्गदर्शन करतात हे असे चित्र अपवादात्मक प्रसंग सोडले तर कधीच बघायला मिळाले नाही. खरं म्हणजे शेतकऱ्यांनी कृषी अधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांच्या घरी जाऊन, गावोगावी जाऊन शेतकऱ्यांना जागृत करायला पाहिजे. कृषिविषयक नवीन नवीन शोध लोकांना सांगायला पाहिजे. माहीती द्यायला पाहिजे. कमी खर्चात शेती कशी चांगल्या पद्धतीने पिकविता येईल याचं ज्ञान द्यायला पाहिजे. ही कृषी कार्यालये ज्या दिवशी प्रामाणिक आपले काम करतील त्याच दिवशी शेती व्यवसायात बरकत दिसेल. परंतु ही कृषी कार्यालये म्हणजे आज पांढरा हत्ती झालेले आहे. केवळ कार्यालयात बसून कागदोपत्री घोडे नाचविणारी ही कार्यालये केवळ शोभेची वस्तू झालेली आहे. ज्या शेतकऱ्यांच्या हिताची जबाबदारी यांच्याकडे आहे त्याचे यांना काही वाटत नाही. केवळ कागदावर बैठका दाखवून, केवळ कागदावर शासकीय कार्यक्रमाची अंमलबजावणी दाखवून, कागदोपत्री भेटी दाखवून खोटे अहवाल पाठविणारी ही कारकुनी जमात केव्हा सुधरेल हे सांगायला नेम नाही. शेतकरी हीत लक्षात घेता काहीतरी तोडगा शासनाने काढायला पाहिजे. जेणेकरून कार्यालयात बसून खुर्चा तोडणारे हे कृषी अधिकारी व त्यांच्या हाताखाली काम करणारे त्यांचे सहकारी बांधावर कसे पोहोचतील. प्रत्यक्ष कृतीतून नियोजन कसे करतील. शेतीविषयी मार्गदर्शन करतील याचं नियोजन प्रत्यक्षात साकार होईल अशा पद्धतीने कार्याची अंमलबजावणी व्हायला पाहिजे. शासनाच्या शेतीविषयक विविध प्रकारच्या योजना घराघरांत प्रामाणिक पोहचवण्याची जबाबदारी कृषी विभागांची आहे. असे झाले तरच कृषी क्षेत्र पुढे जाईल आणि नुकसानी वाचेल. शासनाने प्रत्यक्ष जमिनीवर जाऊन शेतकऱ्यांच्या हितासाठी केवळ दिखाऊ नव्हे तर टिकाऊ योजना राबविण्याची गरज आहे. परंतु दुर्दैवाने लोकप्रियतेसाठी सरकारही दिखाऊपणाकडे जास्त लक्ष देत. हे जर टाळता आले तर शेती नक्कीच फायद्यामध्ये येईल. शासनाने यासाठी समर्पक पावले उचलली नाही तर पुढे येणाऱ्या काळात शेती व्यवसाय केवळ नावापुरताच उरेल अशी भीती वाटायला लागलेली आहे. या देशाला सोने की चिडिया जर करायची असेल, कृषी क्षेत्रातील गेलेले ते चांगले दिवस पुन्हा परत येणे आवश्यक आहे. त्यासाठी कृषी कार्यालये, शेतीचे जाणकार, तज्ज्ञ व शेतीची आवड असणाऱ्या लोकांच्या मार्गदर्शनाची नितांत गरज आहे. शासकीय ध्येय धोरणे अनेक असली तरी ती शेतीनुरूप कशी होईल याकडे दुर्लक्ष होता कामा नये.

# परभणीतून महायुतीचा खासदार निवडून आणणारच ; नेते मंडळींचा संकल्प

**परभणी (प्रतिनिधी)**–पाथरी रोडवरील रेणूका मंगल कार्यालयात रविवारी आयोजित केलेल्या महायुतीच्या जिल्हास्तरीय कार्यकर्ता मेळाव्यातून घटक पक्षाच्या नेतेमंडळीसह पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी लोकसभा जिंकण्याचा संकल्प करतेवेळी जोरदार शक्तीप्रदर्शन केले.



भाजपाच्या परभणी जिल्हा समन्वयक आमदार मेघना साकोरे बोर्डीकर यांनी भारत देशाचे यशस्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मागील १० वर्षाच्या कार्यकाळातील जनसामान्य जनतेसाठी राबविलेल्या योजना मुळेच तिसऱ्या वेळी सुद्धा नरेंद्र मोदी यांनाच पंतप्रधान करण्यासाठी संपूर्ण भारत देश उत्सुक असून या मध्ये परभणी जिल्हा देखील मागे राहणार नसून प्रत्येक कार्यकर्ता हा आपल्या जीवाचे रान करून परभणी लोकसभेची जागा निवडून आणण्यास प्रयत्न करणार असल्याचे नमूद केले.राष्ट्रवादी काँग्रेस अजितदादा गट जिल्हाध्यक्ष बाबाजानी दुर्रानी यांनी आपल्या पक्षातील प्रत्येक कार्यकर्त्यांनी तन्मनाने ही महायुती स्वीकारलेली असून कोणत्याही घटक पक्षाचा महायुतीने दिलेला उमेदवार विजयी करण्याचा दृढ विश्वास यानिमित्ताने बोलून दाखविला.राजेश विटेकर यांनी देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर विश्वास दाखवत अजित दादा पवार आणि प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे महायुतीमध्ये मोठ्या विश्वासाने सामील झाले असून येणाऱ्या काळात तरुणांना सोबत घेऊन लोकसभेतील उमेदवारास निवडून आणण्याचे सगळे प्रयत्न यशस्वी केली जातील असे म्हटले. माजी आमदार हरिभाऊ लहाने यांनी मोदीजींना तिसऱ्यांदा पंतप्रधान करण्याबाबत परभणी जिल्ह्यातील एकही शिवसैनिक घरात न बसता रस्त्यावर उतरून परभणीचा खासदार निवडून आणण्यासाठी कसोशीने प्रयत्न करणार असल्याचे सांगितले.लोकसभा प्रमुख माजी आमदार रामप्रसाद बोर्डीकर यांनी देखील देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वा मुळेच देशांमध्ये गोरगरीब जनतेसाठी मोठ्या प्रमाणामध्ये योजना राबविल्या आहेत त्या योजना आपल्या कार्यकर्त्यांनी घरोघर सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहोचण्याचे काम करण्याचे आवाहन केले तसेच जिल्ह्यातील महायुतीच्या नेत्यांनी आपल्या प्रमुख कार्यकर्त्यांना येणाऱ्या प्रत्येक निवडणुका महायुतीच्या विचारानेच लढूउ आणि गेल्या उमेदवारास प्रचंड मताधिक्याने निवडून आणण्याचा विश्वास देखील या निमित्ताने दाखवून दिला. येणाऱ्या २२ जानेवारी रोजी आयोध्या येथे प्रभू रामचंद्र यांच्या प्राणप्रतिष्ठा सोहळा मोठ्या उत्साहात होणार असून यामध्ये परभणी जिल्ह्यातील प्रत्येक खेड्यामध्ये हा आनंद उत्सव साजरा करण्याचे आवाहन देखील यावेळी त्यांनी केले आहे.याप्रसंगी साकोरे, बोर्डीकर,हरिभाऊलहाने,डॉ.मधुसूदनजी केंद्रे,मोहनराव फड विटेकर,विजयराव वरपूडकर,आनंदराव भरोसे,प्रताप भैय्या देशमुख,संतोष मुरकुटे,राजेश देशमुख,व्यंकटराव शिंदे,माधवराव कदम,एन.डी.दाभाडे,मधुकर अवचार, डॉ.सुभाष कदम,उमेश देशमुख,विलास बाबर,चंद्रकांत राठोड,दशरथ सूर्यवंशी,साहेब भोसले,अनिल नखाते,विठ्ठल मामा रबदडे,व्यंकटराव तांदळे,विद्याताई चौधरी,सुरेश भुमरे,भागवत बाजगीर, रोहन सामाले,किरण तळेकर,संतोष देशमुख,यासह महायुतीचे सर्व जिल्हा पदाधिकारी,तालुका अध्यक्ष व प्रमुख कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा अभियानात सक्रीय सहभागी व्हा-नरवाडे

**जिंतूर । प्रतिनिधी**

दि ११ जानेवारी २०२४ रोजी मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा अभियान, परीक्षा पे चर्चा नोंदणी, नवभारत साक्षरता अभियान, Udise Plus प्रलंबित कार्य याविषयी जिंतूर केंद्रातील सर्व शाळा मुख्याध्यापक व तंत्रास्नेही शिक्षक यांच्यासाठी आयोजित केलेल्या कार्यशाळेत बोलताना ज्येष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी मंगेश नरवाडे यांनी शाळांमध्ये स्पर्धात्मक वातावरण निर्माण होऊन विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा आणि आनंददायी व प्रेरणादायी वातावरण तयार व्हावे, यासाठी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा योजनेंतर्गत 'मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा' हे अभियान ०१ जानेवारी २०२४ पासून संपूर्ण राज्यभरामध्ये सुरू झाले आहे.राज्यातील सर्व व्यवस्थापनांच्या व सर्व माध्यमांच्या शाळांमधील शिक्षक, पालक, विद्यार्थी व माजी विद्यार्थी यांच्यात शाळेप्रती उत्तरदायित्त्वाची भावना निर्माण व्हावी, तसेच त्यायोगे स्पर्धात्मक वातावरणातून विद्यार्थ्यांना शिकण्यासाठी आनंददायी व प्रेरणादायी वातावरण मिळावे यासाठी, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा योजनेंतर्गत 'मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा' या स्पर्धात्मक अभियानाची सुरुवात करण्यात आली आहे. या अभियानाच्या ऑनलाईन नोंदणीला व मूल्यांकनाला सुरुवात झाली आहे. हे अभियान म्हणजे प्रत्येक शाळेला सुधारण्याची संधी आहे असे शिक्षणाधिकारी गणेश शिंदे, उपशिक्षणाधिकारी गजानन वाघमारे, गणराज यरमाळ, गटशिक्षणाधिकारी त्र्यंबक पोले सातत्याने सांगत आहेत. हे अभियान शाळा सुधारण्याची चळवळ बनली पाहिजे म्हणून सर्वांनी सक्रिय सहभागी व्हावे असे प्रतिपादन केले.या कार्यशाळेत जिंतूर केंद्राचे केंद्रप्रमुख मारोती घुगे यांनी मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा अभियान आणि सर्व प्रशासकीय विषयाच्या संदर्भात महत्त्वपूर्ण माहिती सांगितली. मयूर जोशी यांनी या अभियानाची प्रत्यक्ष ऑनलाइन नोंदणी व मूल्यांकनाविषयी माहितील कशी भरावी, परीक्षा पे चर्चा, यु-डायस प्लस याविषयी प्रात्यक्षिकाद्वारे माहिती दिली. नवभारत साक्षरता अभियान कार्यक्रमाविषयी ज्ञानेश्वर भोंबे यांनी माहिती दिली.कार्यशाळेचे सूत्रसंचालन साहित्यिक मयूर जोशी यांनी केले यशस्वीतेसाठी अब्दुल खलील, प्रसन्नजित घनसावंत यांनी मेहनत घेतली.



# स्वामी विवेकानंद पतसंस्थेवर १७ पैकी १५ जागेवर आ.सुरेश धस यांचाच विजयी झेंडा

## सदिच्छा पॅनलचा दणदणीत विजय तर एकता पॅनलचा दारुण पराभव

**आष्टी–**शिक्षकांची कामधेनु पतसंस्था म्हणून समजली जाणारी आष्टी तालुक्यातील कडा येथील स्वामी विवेकानंद शिक्षक सहकारी पतसंस्थेवर आ.सुरेश धस समर्थकांच्या सदिच्छा पॅनलने १५ जागेवर दणदणीत विजय मिळवुन विजयी झेंडा फडकविला तर आ. बाळासाहेब आजबे यांच्या पॅनलला फक्त २ जागेवर विजय मिळवुन समाधान मानावे लागले. या संस्थेवर धस यांनी वर्चस्व मिळवले आहे.

आष्टी तालुक्यातील महत्वाची समजली जाणा-या स्वामी विवेकानंद पतसंस्था पंचवार्षिक निवडणूकीसाठी एकुण १७ जागेसाठी ३४ उमेदवार रिंगणात उतरले आहेत यात सदिच्छा पॅनल विरुद्ध एकता पॅनल अशी सरळ लढत झाली आहे सदिच्छा पॅनल हा आ.सुरेश धस यांच्या समर्थकांचा आहे तर विरोधी पॅनल आ. बाळासाहेब आजबे यांच्या समर्थनाचा असून रविवार दि. १४ जानेवारी रोजी सकाळी ७ ते ३ या वेळेत मतदान प्रक्रिया पार पडली एकूण ९८८ पैकी एक मयत झाले आहेत ९८७ पैकी ९७७ शिक्षकांनी आपल्या मतदानाचा हक्क बजावला तर १० शिक्षकांनी मतदान केले नाही .९९ टक्के मतदान प्रक्रिया पार पडली असून सायंकाळी सहा वाजता मतमोजणी प्रक्रियेला सुरुवात झाली रात्री उशीरापर्यंत मतमोजणी सुरू होती

**निकालाची आकडेवारी पुढीलप्रमाणे**

१)औटे संदीप बबनराव सर्वसाधारण ३४७ (पराभूत),२)करडूळे नितीन दत्तोबा सर्वसाधारण ४९९ (विजयी),३) काळे आप्पासाहेब सिताराम सर्वसाधारण ५५७ (विजयी), ४)काळे संजय पांडुरंग सर्वसाधारण ५५० (विजयी), ५)कोहक साहेबा गजराम सर्वसाधारण ३८० (पराभूत), ६)खाडे चंद्रशेखर पोपटराव सर्वसाधारण ५०२ (विजयी), ७)गाडे अशोक धोंडीराम सर्वसाधारण ३९८ (पराभूत), ८)चव्हाण रत्नाकर किसन सर्वसाधारण ५८८ (विजयी), ९)झांबरे उमेश दिगंबर सर्वसाधारण ४४८ (पराभूत), १०) तांबोळी शमिम बानो अजीम सर्वसाधारण २३६ (पराभूत), ११)थोरवे स्वानंद बलभीम सर्वसाधारण ५८२ (विजयी), १२)दगडे प्रशांत निवृत्ती सर्वसाधारण ५५७ (पराभूत),नरोटे प्रमोद धोंडीराम १३)सर्वसाधारण ४८१ (पराभूत), १४)पठाडे मारुती पंढरीनाथ ६०८ सर्वसाधारण (विजयी), १५)पोकळे हिरामण एकनाथ सर्वसाधारण ५२१ (विजयी),१६)भवर देविदास रावसाहेब सर्वसाधारण ३०३ (पराभूत),१७) महाडिक बाळासाहेब विठ्ठलराव सर्वसाधारण ४२२ (पराभूत), १८)मेहरकर प्रवीण मधुकर सर्वसाधारण ५७४ (विजयी),१९)लटपटे अशोक जनार्दन सर्वसाधारण ५४९ (विजयी), २०)वाणी रावसाहेब रामचंद्र सर्वसाधारण ४३७(पराभूत),२१)शिंदे महेश कुमार नवनाथ सर्वसाधारण५८४ (विजयी), २२)शिंदे विठ्ठल आनंदराव सर्वसाधारण ५३२ (विजयी), २३)शेकडे कैलास शहादेव सदाशिव सर्वसाधारण ३७२ (पराभूत),२४)शेख सलीम सिकंदर सर्वसाधारण ४४२ (पराभूत),२५)ढोबळे लता महादेव महिला राखीव ४७४ (पराभूत), २६)मांगडे कौशल्य भीमराव महिला राखीव ४१३ (पराभूत), २७)सातपुते शैला नारायण महिला राखीव ४८९ (विजयी), २८)होळकर मनीषा शिवराम महिला राखीव ५६(विजयी),२९)गोरे गोरक्ष नवनाथ इतर मागासवर्गीय ४९९ (विजयी), ३०)बनसोडे बाळू एकनाथ इतर मागासवर्गीय ४७४ (पराभूत), ३१) गव्हाळे सुवर्ता अनंतराव अनुसूची जाती जमाती ४७१(पराभूत), ३२) बोराडे पोपट विश्वनाथ अनुसूचित जाती जमाती ५०१(विजयी), ३३)गर्जे आदिनाथ रंगनाथ भ.वि. जमाती ५३८ ( विजयी ),३४) घुले रामभाऊ म्हातारदेव भ. वि.जमाती ४३१ (पराभूत) अशी सर्व उमेदवारांची नावे आहेत.



# लालबहादूर शास्त्री विद्यालय 'माणूस' घडविण्याचे विद्यापीठ-मंत्री संजय बनसोडे


**उदगीर :** येथील लालबहादुर शास्त्री शैक्षणिक संकुलात गेल्या ४३ वर्षांपासून सुरू असलेली 'आंतरशालेय वादविवाद स्पर्धा ' ही विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी स्तुत्य असून या स्पर्धेतून राष्ट्रासाठी अलौकिक बुद्धिमत्तेची विद्यार्थी तयार होत आहेत त्यामुळे लालबहादूर शास्त्री विद्यालय हे 'माणूस' घडविण्याचे विद्यापीठ असल्याचे प्रतिपादन महाराष्ट्र राज्याचे क्रीडा, युवक कल्याण व बंदरे मंत्री संजयजी बनसोडे यांनी केले. ते उदगीर येथील लालबहादूर शास्त्री शैक्षणिक संकुलात आंतरशालेय वादविवाद स्पर्धेच्या उद्घाटन प्रसंगी उद्घाटन म्हणून मंत्री संजय बनसोडे बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे अध्यक्ष डॉ.सुरेंद्र अलूरकर तर प्रमुख पाहुणे म्हणून माजी आमदार गोविंदराव केंद्रे, भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे केंद्रीय सदस्य प्रवीण सरदेशमुख, आप्पाराव यादव, संजय गुरव , लाल बहादूर शास्त्री संकुलाचे अध्यक्ष मधुकरराव वट्टमवार, माध्यमिक शालेय समिती अध्यक्ष सतनप्पा हुरदळे , गोळवलकर संकुलाचे स्थानिक अध्यक्ष चंदूशेट रेखावार , मुख्याध्यापक अंबादास गायकवाड उपस्थित होते.पुढे बोलताना ना.संजय बनसोडे यांनी,देशासाठी




नेतृत्व देणारी बालके अशा स्पर्धांमधूनच घडत असतात. देशाचे पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांच्या कुशल नेतृत्वात देश सध्या महासत्तेकडे वाटचाल करत आहे . आपणही नरेंद्र मोदी,प्रमोद महाजन , गोपीनाथ मुंडे ,विलासराव देशमुख यासारख्या महान व्यक्तींसारखे वाक् चातुर्य मिळवावे असे आवाहन नामदार बनसोडे यांनी यावेळी विद्यार्थ्यांना केले. यावेळी प्रमुख पाहुणे प्रवीण सरदेशमुख यांनी वक्तृत्व कौशल्याचे महत्त्व सांगताना पौराणिक कथा सोबतच अब्राहम लिंकन, स्वातंत्र्यवीर सावरकर ,लोकमान्य टिळक व भाई श्यामलालजी यांची उदाहरणे देत विद्यार्थ्यांनी संवाद कौशल्य अशा स्पर्धांमधूनच विकसित करावे ,असे प्रतिपादन केले.यावेळी माजी आमदार गोविंदराव केंद्रे यांनी लालबहादूर शास्त्री विद्यालयात विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी जाणीवपूर्वक अनेक उपक्रमांचे आयोजन केले जाते म्हणूनच शास्त्री विद्यालयाच्या विद्यार्थ्यांचे वेगळेपण समाजात ठळक दिसून येते, असे मत व्यक्त केले.अध्यक्षीय समारोपात डॉ .सुरेंद्र आलुरकर म्हणाले ,तुम्हाला जीवनात अलौकिक बनायचे असेल तर चांगल्या व्यक्तींचा आदर्श घ्या शाळेच्या चांगल्या उपक्रमात सहभागी व्हा. आपले व्यक्तिमत्व घडविण्यासाठी शालेय जीवनातील स्पर्धा दीपस्तंभासारख्या मार्गदर्शक असतात'' तसेच त्यांनी वादविवाद स्पर्धेत सहभागी स्पर्धकांना शुभेच्छा दिल्या.स्पर्धेच्या सुरुवातीलाच केंद्रीय कार्यकारी समिती सदस्य तथा स्थानिक कार्यवाह शंकरराव लासुणे यांनी स्पर्धा संयोजनामागील भूमिका व भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेच्या अनेक उपक्रमांची सविस्तर माहिती प्रास्ताविकातून दिली. या स्पर्धेसाठी तज्ञ परीक्षक म्हणून डॉ.मकरंद गिरी,प्रा.अरूण धायगुडे व प्रा.अरविंद मुळे काम पाहत आहेत. या स्पर्धेत ४२ संघांचा सहभाग असून दोन दिवस ही स्पर्धा चालणार आहे.'भारत छात्र संसद' च्या १३व्या परिषदेची विजेता विद्यालयाची माजी विद्यार्थींनी प्राजक्ता भांगे,राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळावर सदस्य म्हणून निवड झालेले मुकूंद मिरगे,श्रद्धा पाटील यांचा सत्कार करण्यात आले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन स्पर्धा सहप्रमुख एकनाथ राऊत यांनी केले तर आभार उपमुख्याध्यापक संजयराव कुलकर्णी यांनी मानले. तसेच स्वागत व परिचय बालाजी पडलवार, वैयक्तिक गीत मुकुंद मिरगे तर शांतिमंत्र मंगेश मुळी यांनी म्हटले .या कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी पर्यवेक्षक,कृष्णा मारावार, लालासाहेब गुळभिले,माधव मठवाले,स्पर्धा प्रमुख सचिन यतोंडे व सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी प्रयत्न केले.

## शिवसंग्रामच्या युवक जिल्हाध्यक्षपदी ॲड.गणेश मोरे यांची तर छ.संभाजीनगर महानगर अध्यक्षपदी कुलदीप देशमुख

**आष्टी**–आगामी काळातील निवडणुकाच्या पार्श्वभूमीवर आणि संघटन बांधणीसाठी शिवसंग्राम पक्षाच्या नेत्या डॉ.ज्योतीताई विनायकराव मेटे यांच्या हस्ते व प्रदेशाध्यक्ष श्री.तानाजीराव शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली शिवसंग्राम महाराष्ट्र प्रदेश राज्यस्तरीय पदाधिकारी मार्गदर्शन शिबिर मंगळवारी पुण्यातील पंडित जवाहरलाल नेहरू सभागृहात पार पडले.या मार्गदर्शन शिबिरात शिवसंग्रामच्या युवक बीड जिल्हाध्यक्षपदी ॲड.गणेश आत्माराम मोरे व छ. संभाजीनगर महानगर अध्यक्षपदासाठी श्री.कुलदीप काकासाहेब देशमुख यांना संधी देण्यात आली. डॉ. ज्योतीताई मेटे यांच्या उपस्थितीत प्रदेशाध्यक्ष श्री.तानाजीराव शिंदे यांनी या निवडी जाहीर केल्या. विद्यार्थी दशेपासून चळवळीत सक्रिय असलेले ॲड.गणेश मोरे व श्री. कुलदीप काकासाहेब देशमुख यांना ही संधी देण्यात आली असल्याचे प्रदेशाध्यक्ष श्री.तानाजीराव शिंदे यांनी सांगितले.ॲड. गणेश मोरे यांनी सन २०१७ मध्ये वडगाव कळसंबरच्या सरपंच पदाची निवडणूक लढवली व सरपंच म्हणून स्वतः जनतेतून निवडून आले. त्यानंतर लोकनेते स्वर्गीय विनायकरावजी मेटे साहेब यांच्या समाजकारण व राजकारणास प्रेरित होऊन त्यांचा आदर्श घेत शिवसंग्राम संघटनेमध्ये प्रवेश केला सन २०१७ मध्ये शिवसंग्राम सरपंच संघटनेची जबाबदारी त्यांच्यावर सोपवण्यात आली. सन २०१८



मध्ये शिवसंग्राम युवक तालुका अध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली, सन २०१९ मध्ये शिवसंग्राम संघटनेचा पाली जिल्हा परिषद गणाचा सर्कल प्रमुख व शिवसंग्राम युवक आघाडीचा जिल्हा उपाध्यक्ष म्हणून जबाबदारी मिळाली. ग्रामपंचायत निवडणूक २०२२-२३ मध्येमध्ये पुन्हा सर्व ग्रामपंचायत सदस्यासह जनतेमधून सरपंच म्हणून ते निवडून आले व काल पुणे येथील राज्यस्तरीय चिंतन व मार्गदर्शन शिबिरादरम्यान शिवसंग्राम युवक आघाडीचा जिल्हाध्यक्ष म्हणून त्यांना संधी देण्यात आली. युवक जिल्हाध्यक्ष पदाला साजेशी कामगिरी त्यांच्या हातून घडो यासाठी पुढील कार्यास शुभेच्छा देण्यात आल्या.याप्रसंगी शिवसंग्रामचे प्रदेश सरचिटणीस विक्रांत आंब्रे, प्रदेश सचिव शेखर पवार, हिंदुराव जाधव, खजिनदार रामनाथ जगदाळे, ज्येष्ठ नेते प्रभाकर कोलंगडे, बीड जिल्हाध्यक्ष नारायण काशीद, जिल्हा सरचिटणीस अनिल घुमरे, बीड तालुका अध्यक्ष नवनाथ प्रभाळे, जिल्हा सरचिटणीस प्रा.ज्ञानदेव थोरवे, युवानेते धनंजय फिस्के, भ.वि. आघाडी चे आष्टी तालुकाध्यक्ष माऊली गायकवाड , बाबू धनवडे, प्रा. बीड जिल्हा, तालुका, शहर कार्यकारणी, आघाडीचे अध्यक्ष पदाधिकारी व कार्यकर्ते तसेच पुणे शहराध्यक्ष भरत लगड, कालिंदी गोडांबे,चेतन भालेकर,विनोद शिंदे, लहू ओहोळ,भरत फाटक, सागर फाटक आदी उपस्थित होते.

## कर्नाटकचे मंत्री ना.ईश्वर खंड्रे यांचे कडून निटुरे परिवारांचे सांत्वन



**उदगीर**–उदगीरचे माजी नगराध्यक्ष राजूश्वर निटुरू यांचे सुपुत्र प्रसाद निटुरे यांचे अपघाती निधन झाले .कर्नाटकचे राज्याचे वन मंत्री तथा बिदर जिल्ह्याचे पालक मंत्री ना.ईश्वर खड्रे यांनी उदगीर येथे निटुरे यांच्या निवासस्थानी भेटादेऊन सांत्वन केले.यावेळी माजी मंत्री राजशेखर पाटिल,विधान परिषदेचे आमदार चंद्रशेखर पाटिल,माजी जि.प.अध्यक्ष लक्ष्मणराव बुळ्ळा, माजी नगराध्यक्ष शिवराज गंगशेट्टी, डॉ.अरुण कुरले, हुमनाबाद काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष फसमिय्या शेख,सुभाष धनूरे, सुभाष नागठाने, रामराव बिरादार मामा, कल्याण पाटील,राहुल मुच्चेवाड,प्रशांत गायकवाड, लालखाँ पठाण आदी उपस्थित होते.

## राज्याभिषेक सोहळ्यासाठी अहमदनगर जिल्ह्यातील संगमनेर तालुक्यातील खांडगाव येथील गुंजाळ यांची निवड

**संगमनेर । प्रतिनिधी**

छत्रपती शंभुराजे राज्याभिषेक सोहळा समिती, रायगड महाराष्ट्र राज्याचे आराध्य दैवत छत्रपती



शिवाजी महाराज यांचे जेष्ठ चिरंजीव छत्रपती संभाजी राजे यांचा राज्याभिषेक किल्ले रायगड वरती दरवर्षी १६ जानेवारीला साजरा करतात.ज्या शेतकऱ्यांनी महाराष्ट्राचे नाव देश व आंतरराष्ट्रीय पातळीवर मोठे केले आहे त्या शेतकऱ्यांच्या हस्ते हा राज्याभिषेक सोहळा साजरा होणार आहे. संगमनेर तालुक्यातील खांडगाव गावचे महाराष्ट्र शासन तसेच राज्यस्तरीय अनेक पुरस्कार प्राप्त शेतकरी संदीप गवराम गुंजाळ यांच्या शेती बद्दल कामाची दखल व ते शेतीत करीत असलेल्या नवनवीन प्रयोगांची दखल घेत पद्मश्री राहीबाई पोपेरे व पद्मश्री पोपटराव पवार यांच्याबरोबर छत्रपती शंभुराजे यांचा जलाभिषेक करण्याचा सन्मान छत्रपती शंभुराजे अभिषेक सोहळा समिती रायगड व सर्व शिवशंभु पाईक यांच्या वतीने मिळाला आहे.त्या बद्दल महाराष्ट्र विधिमंडळ गटनेते व माजी महसूलमंत्री आमदार बाळासाहेब थोरात,माजी आमदार डॉ.सुधीर तांबे,आमदार सत्यजित तांबे, खांडेश्वर देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष लहानूभाऊ गुंजाळ, सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात साखर कारखान्याचे संचालक रमेशभाऊ गुंजाळ,डव्होकेट मधुकर गुंजाळ,प्राचार्य अशोक गुंजाळ तसेच सर्व ग्रामस्थ यांनी संदीप गुंजाळ यांचे अभिनंदन केले आहे.

## विकसित भारत संकल्पच्या माध्यमातून विविध योजनेची माहिती ;शेतकऱ्यांचा या कार्यक्रमाला विरोध

**कौसडी । प्रतिनिधी**

जिंतूर तालुक्यातील कौसडी येथील हनुमान मंदिर परिसरात दिनांक १३ जानेवारी शनिवार रोजी दुपारी बारा वाजण्याच्या दरम्यान विकसित भारत संकल्प यात्रेच्या माध्यमातून शासनाच्या विविध योजनेची माहिती ग्रामस्थांना देण्यात आली आहे.

विकसित भारत संकल्प यात्रे च्या माध्यमातून राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या अंतर्गत वैयक्तिक सिंचन विहीर, शेतकल्याण फळबाग योजनेवर १००% अनुदान, घरकुल योजना, प्रधानमंत्री आवास योजना, मोदी आवास योजना, यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत घरकुल योजना, रमाई आवास योजना, शबरी आवास योजना तसेच आयुष्यमान भारत योजनेअंतर्गत पाच लाखापर्यंत मोफत औषध उपचार योजना अशा विविध प्रकारच्या योजनेची माहिती



या कार्यक्रमादरम्यान तुरळीक उपस्थित ग्रामस्थांना देण्यात आली.यावेळी विस्तार अधिकारी एस.व्हि.ढोणे, सरपंच मोबीन कुरेशी, उपसरपंच रविकांत देशमुख, ग्रामविकास अधिकारी एस.बी.खराबे, तलाठी विश्वजीत खरात, कृषी सहाय्यक कैलास देशमुख, मुख्याध्यापिका सुनीता गाजरे, आरोग्य सहाय्यक एन.एस.गिराम आरोग्य सेवक आर.एन.काळे आरोग्य सेविका एस.एम.सिंगारे पोलीस कर्मचारी अनिल शिंदे शरद सावंत व भाजपाचे कार्यकर्ते तसेच ग्रामपंचायत सदस्य व तुरळीक नागरिक उपस्थित होते.विकसित भारत संकल्प यात्रेचा रथ कौसडी येथे सकाळी साडेनऊ वाजण्याच्या दरम्यान हनुमान मंदिर परिसरात दाखल झाला होता कार्यक्रमासाठी सर्व अधिकारी सरपंच उपसरपंच ग्रामपंचायत सदस्य कर्मचारी व विद्यार्थीजमा झाले होते. संबंधित अधिकाऱ्यांना शेतकऱ्यांनी शेतीमालाला भाव का नाही याबद्दल माहिती विचारली असता अधिकाऱ्यांकडे या प्रश्नाचा उत्तर नसल्यामुळे शेतकऱ्यांनी हा कार्यक्रम उधळून लावला होता परंतु विस्ताराधिकारी यांनी पोलीस कर्मचाऱ्यांना बोलून दोन तासानंतर भाजप कार्यकर्ते व तुरळीक नागरिकांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम घेतला.

## राज्य शासनाच्या उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार २०२३ साठी प्रवेशिका पाठविण्याचे आवाहन

**मुंबई**–माहिती व जनसंपर्क महासंचालनालयामार्फत उत्कृष्ट पत्रकारिता, उत्कृष्ट लेखन, उत्कृष्ट दूरचित्रवाणी वृत्तकथा, उत्कृष्ट छायाचित्रकार, समाज माध्यम आणि स्वच्छता अभियानाबाबत केलेल्या जनजागृतीपर लेखनासाठी पुरस्कार स्पर्धा जाहीर करण्यात येत आहे. या स्पर्धेसाठी दिनांक १ जानेवारी, २०२३ ते ३१ डिसेंबर, २०२३ पर्यंतच्या कालावधीत प्रसिद्ध झालेल्या लेखन/छायाचित्रे/वृत्तकथा यांच्या प्रवेशिका मागविण्यात येत आहेत. प्रवेशिका पाठविण्याचा अंतिम दिनांक ३१ जानेवारी २०२४ असा आहे. उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार २०२३ चे माहितीपत्रक/अर्जाचे नमुने शासनाच्या www.maharashtra.gov.in आणि महासंचालनालयाच्या dgipr.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. तसेच राज्यातील विविध भागातील स्पर्धकांना संबंधित जिल्हा माहिती कार्यालयाकडून तर मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्ह्यातील इच्छुकांना, तसेच दिल्ली येथील पत्रकारांनी आपल्या प्रवेशिका थेट किंवा महाराष्ट्र परिचय केंद्रामार्फत मुख्यालयात माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, तळमजला, हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई-३२ येथून विहित नमुन्यातील अर्ज प्राप्त करुन घेता येईल.राज्य शासनामार्फत देण्यात येणाऱ्या पुरस्कारांमध्ये ०१ राष्ट्रीयस्तरीय ११ राज्यस्तरीय तर, ८ विभागीय स्तरावरील पुरस्कार असे एकूण २० पुरस्कार प्रदान करण्यात येतात. त्याची माहिती पुढीलप्रमाणे आहेत

पुरस्कारांची माहिती-पुरस्काराचे नाव व पारितोषिक पूढील प्रमाणे १.अटलबिहारी वाजपेयी राष्ट्रीय पत्रकारिता पुरस्कार (राष्ट्रस्तरीय) १,००,०००/- (रुपये एक लाख रोख) (मानचिन्ह व प्रशस्तीपत्रक) २. बाळशास्त्री जांभेकर पुरस्कार (मराठी) (राज्यस्तर) ५१ हजार रुपये (मानचिन्ह व प्रशस्तीपत्र) ३. अनंत गोपाळ शेवडे पुरस्कार (इंग्रजी) (राज्यस्तर) ५१ हजार रुपये (मानचिन्ह व प्रशस्तीपत्र) ४. बाबूराव विष्णू पराडकर पुरस्कार (हिंदी) (राज्यस्तर) ५१ हजार रुपये (मानचिन्ह व प्रशस्तीपत्र) ५. मौलाना अबुल कलाम आझाद पुरस्कार(उर्दू) (राज्यस्तर) ५१ हजार रुपये (मानचिन्ह व प्रशस्तीपत्र) ६. यशवंतराव चव्हाण पुरस्कार शासकीय गट (मराठी) (माहिती व जनसंपर्क) (राज्यस्तर) ५१ हजार रुपये (मानचिन्ह व प्रशस्तीपत्र) ७. पु.ल.देशपांडे उत्कृष्ट दूरचित्रवाणी वृत्तकथा पुरस्कार(राज्यस्तर) ५१ हजार रुपये (मानचिन्ह व प्रशस्तीपत्र) ८. तोलाराम कुकरेजा उत्कृष्ट वृत्तपत्र छायाचित्रकार पुरस्कार (राज्यस्तर) ५१ हजार रुपये (मानचिन्ह व प्रशस्तीपत्र) ९. केकी मूस उत्कृष्ट छायाचित्रकार पुरस्कार शासकीय गट (माहिती व जनसंपर्क) (राज्यस्तर) ५१ हजार रुपये (मानचिन्ह व प्रशस्तीपत्र) १०. समाजमाध्यम पुरस्कार (राज्यस्तर) ५१ हजार रुपये (मानचिन्ह व प्रशस्तीपत्र) ११. स्वच्छ महाराष्ट्र जनजागृती पुरस्कार (राज्यस्तर) ५१ हजार रुपये (मानचिन्ह व प्रशस्तीपत्र) १२. पत्रकार सुधाकर डोआईफोडे अग्रलेखन पुरस्कार (राज्यस्तर) ५१ हजार रुपये (मानचिन्ह व प्रशस्तीपत्र)

विभागीय पुरस्कार-१३. दादासाहेब पोतनीस पुरस्कार, (नाशिक विभाग) ५१ हजार रुपये (मानचिन्ह व प्रशस्तीपत्र, या व्यतिरिक्त रुपये १० हजार दै.गावकरीने पुरस्कृत केले आहेत.) १४. अनंतराव भालेराव पुरस्कार, (छत्रपती संभाजीनगर आणि लातूर विभाग) ५१ हजार रुपये (मानचिन्ह व प्रशस्तीपत्र) १५. आचार्य अत्रे पुरस्कार, (मुंबई विभाग) ५१ हजार रुपये (मानचिन्ह व प्रशस्तीपत्र) १६. नानासाहेब परूळेकर पुरस्कार, (पुणे विभाग) ५१ हजार रुपये (मानचिन्ह व प्रशस्तीपत्र) १७. शि.म.परांजपे पुरस्कार, (कोकण विभाग) ५१ हजार रुपये (मानचिन्ह व प्रशस्तीपत्र) १८. ग.गो.जाधव पुरस्कार, (कोल्हापूर विभाग) ५१ हजार रुपये (मानचिन्ह व प्रशस्तीपत्र) १९. लोकनायक बापूजी अणे पुरस्कार, (अमरावती विभाग) ५१ हजार रुपये (मानचिन्ह व प्रशस्तीपत्र) २०. ग.त्र्यं.माडखोलकर पुरस्कार, (नागपूर विभाग) ५१ हजार रुपये (मानचिन्ह व प्रशस्तीपत्र).

सह्याद्रीचा राखणदार



# रोटरी क्लब चंद्रपूरच्या वतीने १२५ विद्यार्थ्यांना सायकलींचे वितरण




**चंद्रपूर । प्रतिनिधी**

रोटरी क्लब ऑफ चंद्रपूरच्या वतीने रोटरी डिस्ट्रिक्ट ३०३० च्या माध्यमातून उडान या संकल्पनेवर आधारीत उपक्रमांतर्गत ग्रामीण व शहरी भागात शिक्षण घेणाऱ्या गरीब होतकरू विद्यार्थ्यांना रोटरी डिस्ट्रिक्ट ३०३० च्या प्रांतपाल आशा वेणुगोपाल यांच्या हस्ते १२५ सायकलींचे वितरण करण्यात आले. येथील एन.डी. हॉटेलच्या प्रांगणात झालेल्या या कार्यक्रमाला मंचावर सहाय्यक प्रांतपाल रमा गर्ग, चंद्रपूर रोटरी क्लबचे अध्यक्ष अनुप यादव, माजी अध्यक्ष डॉ. विजय, सचिन गांगरेड्डीवार, महेश उचके, सचिव कुंजबिहारी परमार उपस्थित होते. रोटरी क्लबच्या वतीने विविध सामाजिक, शैक्षणिक, आरोग्य तथा विविध क्षेत्रात समाजउपयोगी उपक्रम राबविण्यात येतात. गरजवंतांच्या पंखात बळ भरणाऱ्या रोटरीच्या उपक्रमामुळे अनेकांचे जीवन आनंदमयी झाले आहेत. आता गरीब शालेय विद्यार्थ्यांना उडान उपक्रमांतर्गत सायकलच्या माध्यमातून केलेल्या मदतीमुळे त्यांच्या पंखात बळ भरले गेले आहे. भविष्यात ही मुले गरूड भरारी घेतील असा विश्वास प्रांतपाल आशा वेणुगोपाल यांनी व्यक्त केला. या उपक्रमाचे श्रीमती वेणुगोपाल यांनी कौतूक केले. याप्रसंगी, शाळा तथा वसतीगृहात राहून शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना १२५ सायकलींचे वाटप श्रीमती वेणुगोपाल यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी सहायक प्रांतपाल रमा गर्ग यांनीही या उपक्रमाचे कौतूक करतांना विद्यार्थ्यांनी शिक्षण घेवून जागृत नागरिक होण्याचे आवाहन केले. प्रास्ताविक भाषणात रोटरी क्लब चंद्रपूरचे अध्यक्ष अनुप यादव यांनी रोटरीच्या माध्यमातून सुरू असलेल्या सामाजिक कार्याची माहिती दिली. कार्यक्रमाचे संचालन श्रीमती स्मिता जीवतोडे यांनी केले. आभार सचिव कुंजबिहारी परमार यांनी मानले. या कार्यक्रमाचे प्रोजेक्ट डायरेक्टर सुजर वाघ होते. कार्यक्रमाला माजी अध्यक्ष ड. प्रशांत खजांची, राम चांदे, डॉ. अशोक वासलवार, मधुसूदन रूंगठा, अरूण तिखे, जितेंद्र दोशी, अशोक हसानी, प्रदीप बुक्कावार, सचिन गांगरेड्डीवार, ड. विनायक बापट, अविनाश उत्तरवार, किर्ती चांदे, अजय जयस्वाल, श्रीकांत रेशीमवाले, संतोष तेलंग, महेश उचके, स्मिता जिवतोडे, अजय पालारपवार, अनुपमा भामरी, संजय उपगन्लावार, मिलिंद बोडखे, नविन चोरडीया यांच्यासह अनेक मान्यवर रोटरी सदस्य सहपरिवार , रोट्रेक्टर्स , इनरव्हील सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# वरोरा येथे वीज लाईन स्टाफ कर्मचाऱ्यांचे काम बंद आंदोलन

**वरोरा । प्रतिनिधी**



वीज लाईन स्टाफ कर्मचारी यांच्या प्रलंबित व विविध मागण्यांसाठी जळगाव येथील बाजार समितीसमोरील महावितरण कार्यालयाच्या प्रवेशद्वाराजवळ आमरण उपोषण सुरू आहे. त्याच धर्तीवर शुक्रवार, १९ जानेवारीला सकाळी ११ वाजता चंद्रपूर जिल्ह्यातील वरोरा येथे कर्मचाऱ्यांनी काम बंद आंदोलनाला सुरवात केली असून प्रशासनाच्या धोरणा विरोधात निदर्शने करण्यात आली .महावितरण विभागात काम करणाऱ्या वीज लाईन स्टाफ कर्मचाऱ्यांना स्वतंत्र वेतनश्रेणी देण्यात यावी, वर्ग ४ च्या नोकरीतील लाईन स्टाफ कर्मचाऱ्यांना वर्ग ३ मध्ये वर्गीकरण करण्यात यावे, कर्मचारी यांचे कामाचे तास व स्वरूप निश्चित करण्यात यावे, यासह विविध मागण्यांसाठी महाराष्ट्र राज्य वीज लाईन स्टाफ बचाव कृती समिती महाराष्ट्र यांच्या वतीने मंगळवार १६ जानेवारी रोजी पासून जळगाव येथे महावितरण कार्यालयाच्या प्रवेशद्वाराजवळ आमरण उपोषण सुरू आहे. उपोषणाचा चौथा दिवस उजळाला मात्र, महावितरण प्रशासनाकडून याकडे दुर्लक्ष केले जात आहे. त्यामुळे वरोरा येथील वीज लाईन स्टाफ कर्मचाऱ्यांनी बेमुदत काम बंद आंदोलनाला सुरुवात केली आहे . दरम्यान, या उपोषणाला चार दिवस उलटूनही महावितरण प्रशासन याकडे लक्ष देत नसल्याचे आक्रमक झालेल्या लाईन स्टाफ वीज कर्मचाऱ्यांनी वसुलीसह विविध कामावर बहिष्कार टाकला आहे. जोपर्यंत मागण्या पुर्ण होत नाही तोपर्यंत काम बंद आंदोलन सुरूच राहिल अशी प्रतिक्रीया महाराष्ट्र राज्य वीज लाईन स्टाफ बचाव कृती समितीचे पदाधिकारी संदीप उईके यांनी दिली.

# महिला सक्षमीकरणा साठी ग्रामीण भागात लघू उद्योग निर्माण करणार–आ. बाळासाहेब आजबे

**आष्टी**–ग्रामीण भागामध्ये उत्पादनाची साधने कमी असल्याने महिलांना रोजगार मिळणे व स्वतःच्या पायावर उभा राहणे कठीण जाते. त्यासाठी गावागावात प्रमुख लोकांनी एकत्र येत बचत गटाच्या माध्यमातून महिलांना लघुउद्योग सुरू करून देण्यासाठी पुढे यावे. महिला सक्षमीकरणासाठी गावागावात प्रशिक्षण केंद्र स्थापन करण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे आमदार बाळासाहेब आजबे यांनी यावेळी बोलताना सांगितले.आष्टी मतदार संघाचे आमदार बाळासाहेब आजबे काका यांच्या हस्ते दौलवडगाव येथे रणरागिणी महिला सक्षमीकरण व लघुउद्योग प्रशिक्षण केंद्राचे उद्घाटन करण्यात आले यावेळी बाबासाहेब पिसोरे, ज्येष्ठ नेते काकासाहेब शिंदे, जगन्नाथ ढोबळे, हरिभाऊ दहातोंडे, परसराम मराठे, महादेव डोके, शिवाजी शेकडे, शामराव फसले, सरपंच भरत जाधव, रावसाहेब दळवी, नंदू फसले, आजिनाथ फसले यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी बोलताना



आमदार आजबे म्हणाले, महिला सक्षम झाल्याशिवाय ग्रामीण भागाचा विकास होणार नाही. त्यासाठी महिलांनी फक्त शेतातील कामे न करता इतर छोटे मोठे घरगुती व्यवसाय सुरू केले पाहिजेत.महिला बचत गटातील सदस्यांनी एकत्र येऊन छोटे–मोठे प्रशिक्षण घेऊन गावातच वेगवेगळे उद्योग कसे सुरु होतील यासाठी प्रयत्न करून गावातील सरपंच यांनी ग्रामपंचायतच्या माध्यमातून त्यांना वेळोवेळी मदत करणे गरजेचे आहे. हे सर्व करत असताना महिलांना प्रोत्साहन व संधी उपलब्ध करून देणे गरजेचे असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. यावेळी कृषिरत्न बाबासाहेब पिसोरे, सरपंच भरत जाधव यांनी आपले मनोगत व्यक्त केले. सरपंच भरत जाधव म्हणाले, आपणगावामध्ये छोटे–मोठे व्यवसायासाठी यंत्रसामुग्री व जागा उपलब्ध करून देऊन गावातच छोटे–मोठे व्यवसाय सुरू करण्याला प्राधान्य देणार आहोत. व आमदार बाळासाहेब आजबे यांच्या माध्यमातून गावांमध्ये अनेक विकास कामे झाली. वेळोवेळी त्यांची मदत मिळाल्यामुळेच आज गावामध्ये विकास कामे दिसत आहेत असेही सरपंच भरत जाधव यांनी सांगितले. यावेळी नंदू फसले, बाळासाहेब कोहक, अजिनाथ फसले, शामराव फसले, बशीर मामू, बाजीराव अडबले, नवनाथ इथापे, मीरा मामू ,प्रवीण जाधव, प्रदीप बांगर, चेतन पाटोळे, काकडे, यांच्यासह मोठ्या संख्येने कार्यकर्ते व महिला उपस्थित होत्या.

# विविध १००श्रद्धास्थानी स्वच्छता अभियान राबविणार – आ.जोरगेवार

## काळाराम मंदिर येथे स्वच्छता अभियान,नागरिकांचा उत्स्फृत प्रतिसाद

**चंद्रपूर । प्रतिनिधी**



चंद्रपूर मतदार संघात आपण मंदिर स्वच्छता अभियानाला सुरवात केली असुन चंद्रपूरची आराध्य दैवत माता महाकाली मंदिरापासून आपण याचा शुभारंभ केला आहे. आज आपण चंद्रपूरातील प्राचीन काळाराम मंदिर येथे स्वच्छता अभियान राबविले असुन येत्या काही दिवसात चंद्रपूरातील विविध१००श्रध्दा स्थानांची स्वच्छता करणार असल्याचे आमदार किशोर जोरगेवार यांनी म्हटले आहे.आज शुक्रवारी आमदार किशोर जोरगेवार यांनी चंद्रपूरातील प्राचीन असलेल्या काळाराम मंदिरात स्वच्छता अभियान राबविले. यावेळी श्री माता महाकाली महोत्सव समिती,चंद्रपूर महानगरपालिका आणि यंग चांदा ब्रिगेड या सामाजिक संघटनेने सहभाग घेतला होता. यावेळी मनपा आयुक्त विपिन पालिवाल,माजी नगर सेवक बलराम डोडाणी,माता महाकाली महोत्सव समितीचे सचिव अजय जयस्वाल,विश्वस्त मलिंद गम्पावार, यंग चांदा ब्रिगेडचे युवा नेते अमोल शेंडे,आदिवासी विभागाचे जिल्हा अध्यक्ष जितेश कुळमेथे,ग्रामीण तालुकाध्यक्ष राकेश पिंपळकर, सविता दंढारे,सायली येरणे,भाग्यश्री हांडे,आशा देशमूख,अल्का मेश्राम,शंकर दंतुलवार,राम मंढे,ॲड. परमहंस यादव,राहुल मोहुर्ले,हेरमन जोसेफ,देवा कुंटा,तापोष डे,बबलू मेश्राम आदींची उपस्थिती.येत्या२२जानेवारीला अयोध्येत आयोजित रामललाच्या प्राणप्रतिष्ठापनेची तयारी जोरात सुरु आहे. महाराष्ट्रातही२२जानेवारीला राज्यभर विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. दरम्यान राज्यभरातील मंदिरांमध्ये स्वच्छता अभियान राबविण्यात यावे असे आवाहण राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले होते. त्याला प्रतिसाद देत आमदार किशोर जोरगेवार यांनीही मंदिरामध्ये स्वच्छता मोहिम सुरु केली असुन याची सुरुवात चंद्रपूरची आराध्य दैवत असलेल्या माता महाकालीच्या मंदिरातून करण्यात आली होती.दरम्यान आज चंद्रपूरातील प्रसिध्द असलेल्या पुरातण काळाराम मंदिर येथे आमदार किशोर जोरगेवार यांच्या वतीने स्वच्छता अभियान राबविण्यात आले. या अभियानाला नागरिकांनीही उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. यावेळी मंदिर परिसर संपूर्णरित्या स्वच्छ करण्यात आला. पुढेही हा उपक्रम सुरुच राहणार असल्याचे आमदार किशोर जोरगेवार यांनी म्हटले आहे.

## जैवविविधतेचे जतनवसंवर्धन ही काळाची गरज

# हवनमंत्र्यांच्याहस्ते राज्य जैवविविधता मंडळाच्या दिनदर्शिकेचे प्रकाशन



**चंद्रपूर । प्रतिनिधी**

जैवविविधतेचे जतन व संवर्धन ही काळाची गरज बनली आहे,असे प्रतिपादन वन मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी केले.महाराष्ट्र राज्य जैवविविधता मंडळाच्या वतीने तयार करण्यात आलेल्या राज्यातील जैवविविधता दर्शविणाऱ्या सन २०२४ च्या बहुरंगी वार्षिक दिनदर्शिकेचे प्रकाशन वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या हस्ते करण्यात आले,तेव्हा ता बोलत होते.महाराष्ट्रातील मानचिन्हांसह राज्यातील विविध परिसरात आढळणारे वन्यप्राणी,पशू-पक्षी,फुले यांच्या सुंदर छायाचित्रांनी ही दिनदर्शिका सजली आहे. महाराष्ट्राची ही जैवविविधता सर्वांपर्यंत पोहोचली पाहिजे,असे आवाहनही यावेळी मंत्री श्री. मुनगंटीवार यांनी केले.मंत्रालयातील परिषद सभागृहात झालेल्या या छोटेखानी प्रकाशन समारंभास वन विभागाचे प्रधान सचिव बी. वेणूगोपाल रेड्डी यांच्यासह वन विभागाचे इतर वरिष्ठ अधिकारी उपस्थितहोते.यादिनदर्शिकेत आंबा,जारुळ, शेकरु, हरियाल, निलवंत,पांढरी चिप्पी आणि पापलेट ही मानचिन्हे छापण्यात आली आहेत. याशिवाय,राज्यातील रामसर स्थळे आणि तेथे आढळणारे मोठा रोहित. मोर शराटी,रंगीत कारकोचा,पाणचिरा,पट्ट कदंब हंस,चक्रवाक यांची छायाचित्रे विशेष लक्ष वेधून घेतात. नांदूर मध्यमेश्वर,लोणार सरोवर. ठाणे खाडी येथील छायाचित्रे या दिनदर्शिकेत वापरण्यात आली आहेत.विविध प्रजातींची फुलपाखरे,वाघ,बिबट्या सारखे प्राणी,विविध प्रजातींचे पक्षी,ठोसेघर,लिंगमळा येथील धबधबे,पश्चिम घाटात आढळणाऱ्या स्थानिक वनस्पती व प्रजाती,कास पठारावरील निसर्ग वैविध्य,सरपटणारे प्राणी,विविध ठिकाणची जैवविविधता वारसा स्थळे आदींच्या छायाचित्रांच्या समावेशाने ही दिनदर्शिका अधिक आकर्षक बनली आहे.याशिवाय, प्रत्येक महिनानिहाय वन,पर्यावरण, जैवविविधता आदी बाबींशी निगडीत असणाऱ्या दिवसांची नोंदही आवर्जून दिनदर्शिकेमध्ये घेण्यात आली आहे.

# बालपणी आईने सांगितलेल्या रामायण आणि महाभारतातील प्रसंगातून सामाजिक संस्कारासह समाजकार्याची प्रेरणा मिळाली–आ.जोरगेवार

**चंद्रपूर । प्रतिनिधी**




स्वामी तिन्ही जगाचा आई विना भिकारी ही कवी यशवंत यांची ओळ तंतोतंत सत्य आहे. आज माझी आई जगात नाही. मात्र प्रत्येक क्षणी ती स्मरणात असते. तिने बालपणात केलेले संस्कार हिच जोरगेवार कुटुंबीयांची खरी संपत्ती आहे. तिच्या संस्कारातुन आज जोरगेवार कुटुंब भक्कम उभे आहे. आईने बालपणी सांगितलेल्या रामायण, महाभारतातील प्रसंगातून सामाजिक संस्कारासह समाजकार्याची प्रेरणा मिळाली असे प्रतिपादन आमदार किशोर जोरगेवार यांनी केले. स्व. प्रभाताई जोरगेवार यांच्या जयंती निमित्त सरदार पटेल महाविद्यालयातील सभागृहात स्व. प्रभाताई जोरगेवार चॅरिटेबल फाऊंडेशन ट्रस्टच्या वतीने साहित्य वाटप करण्यात आले होते. या प्रसंगी ते बोलत होते. या कार्यक्रमाला सर्वोदय शिक्षण मंडळाच्या अध्यक्षा श्रीमती सुधाताई पोटदुखे,सचिव भरत पोटदुखे,सहसचिव डॉ. किर्तीवर्धन दिक्षीत,प्रा. श्याम धोपटे,प्राचार्य प्रमोद काटकर,कल्याणी किशोर जोरगेवार,आमदार किशोर जोरगेवार यांच्या बहिण उज्वला पार्लेवार, माजी नगर सेवक बलराम डोडाणी,माता महाकाली महोत्सव समीतीचे सचिव अजय जैस्वाल,योग नृत्य परिवाराचे संस्थापक अध्यक्ष,गोपाल मुंधडा आदींची मंचावर उपस्थिती होती. यावेळी पूढे बोलताना आ. जोरगेवार म्हणाले. मला जन्म देणारी आणि माझे पालन पोषण करणारी अशा दोन आई आम्हाला मिळाल्या. यासाठी आम्ही स्वतःला भाग्यवान समजतो. अत्यंत गरीब परिस्थितीत आम्ही बालपण जगले. नंतर स्वतःचा व्यवसाय सुरु केला. हलाकिच्या या परिस्थितीतही तीने कधी अप्रामाणीक होऊ दिले नाही. विचलीत होउन मिळालेल्या क्षणिक सुखा पेक्षा समाधानाची भाकर खाउन जगायची शिकवण तिने दिली. मी डॉक्टर व्हावे तिची इच्छा होती. पण ते परिस्थितीमुळे शक्य झाले नाही. इंग्रजी माध्यममध्ये माझे शिक्षण तिला करायचे होते. मात्र फी भरण्यास आम्ही सक्षम नव्हतो. आईने वारंवार शाळा व्यवस्थापनाशी विनवनी केली. मुलासाठी आईचा आग्रह पाहुन शाळाचे संस्थापक, अध्यक्ष राजेंद्र खजानजी यांनी मला इंग्रजी माध्यमात दाखल करून घेतले. एका खाजगी शाळेत फी न भरता इंग्रजी माध्यमात शिकणारा कदाचित मी पहिला विद्यार्थी असेल असेही ते यावेळी आईंच्या आठवणी सांगताना म्हणाले. माझ्यावर शस्त्रक्रिया झाली त्यावेळी राजेंद्र खजाजनी यांनी त्याकाळी मला १०० रुपयाची मदत केली होती असेही यावेळी बोलतांना ते म्हणाले

मी राजकारणात जावे ही आईची इच्छा नव्हती. मात्र२००९च्या निवडणूकीत मला पक्षाचे टिकीट मिळाले नाही. तेव्हा मी पक्षाने दिलेल्या उमेदवारासाठी काम केले. ते निवडुन आले. रात्रो विजय मिरवणूक निघाली. या विजय मिरवणुकीत सगळ्यांच्या समोर राहण्याच्या उत्सुकतेत मी मात्र मागे राहिलो. हे आईने पाहिले आणि तु नेहमी मागे राहतो, मात्र आता तु पूढे राहा, राजकारणात जा, मी असेल कि नसेल पण तू आमदार बनायचं हे वाक्य आईच्या तोंडून निघाले होते. माझ्या इच्छेसाठी तिने तिच्या ईच्छेविरोधात मला राजकारनात काम करायला सांगीतले हे केवळ आईच करु शकते असे ते यावेळी म्हणाले. त्यानंतर मी कधीही थांबलो नाही. कष्ट प्रामाणीकता आणि सेवा या तिच्या शिकवणी प्रमाणे वागण्याचा प्रयत्न केला. आणी तो सदैव करेल असे ते या प्रसंगी बोलताना म्हणाले. या कार्यक्रमात दिव्यांग बांधवांना व्हिल चेअर,प्लास्टिक मॅटिन,योग नृत्य परिवाराला ध्वनीक्षेपन संच आणि नरसिंह आखाडा बाबूपेठ व योग नृत्य परिवार यांना प्लास्टिक खुर्चीचे,गरज वंतांना उपयुक्त साहित्याचे तसेच क्रीडा क्षेत्रातील खेळाडूंना खेळउपयोगी साहित्याचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. श्याम धोपटे व संचालन शिक्षिका सरोज चांदेकर यांनी केले यावेळी डॉ किर्तीवर्धन दीक्षित यांचेही मार्गदर्शन लाभले. कार्यक्रमाला यंग चांदा ब्रिगेड व विविध सामाजिक संघटना नागरिकांची उपस्थिती होती.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .